<u>संसद आदर्श ग्राम योजना.</u>राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौजे पाचगांव, (ता. उमरेड, जि. नागपूर) या वाढीव दरडोई खर्च असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः ग्रापापु-१११५/प्र.क्र.१९९/पापु-१३
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: १ जानेवारी, २०१६

<u>वाचा</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१११५/प्र.क्र.१९९/पापु-१३, दि. ९ डिसेंबर, २०१५.

शासन शुध्दीपत्रक

मौजा पाचगांव, (ता. उमरेड, जि. नागपूर) हे गांव केंद्र शासनाच्या "संसद आदर्श ग्राम योजने" अंतर्गत मा.श्री. नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री, भारत सरकार यांनी दत्तक घेतले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक २४/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत "संसद आदर्श ग्राम" योजनेत समाविष्ट गावांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरुन मौजे पांचगाव नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु.४,७५,८२,११६/- (ढोबळ) किंमतीच्या अंदाजपत्रकास संदर्भीय दि. ०९.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त दि. ०९.१२.२०१५ च्या शासन निर्णयातील **परिच्छेद तीन मधील अनुक्रमांक-४** येथे "सदर योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी करावी. योजना पुर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. योजना यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे, याची खात्री ग्रामपंचायतीने करावयाची असून योजना पुर्ण होऊन चाचणी झाल्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायत / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती / संदर्भाधिन अनु.क्र.४ मधील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे करण्यात यावी". **या ऐवजी** "सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावी. योजना पुर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. योजना यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे, याची खात्री जिल्हा परिषदेने करावयाची असून योजना पुर्ण होऊन चाचणी झाल्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती संबंधित कंत्राटदारामार्फत ३ ते ५ वर्षापर्यंत करण्यात यावी" असे वाचावे.

२. सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०१०११५१२०६०८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Deoram Ambekar

Digitally signed by Suresh Deoram Ambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Suresh Deoram Ambekar
Date: 2016.01.02 11:47:14 +05'30'

(सु.दे.आंबेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव,मंत्रालय मुंबई.
३. श्री. नितीन गडकरी, मा. मंत्री (भुपृष्ठ वाहतूक) भारत सरकार, नवी दिल्ली.
४. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज/जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव,पा.पु.व स्व.वि.,मंत्रालय,मुंबई.
९. विभागीय आयुक्त,नागपूर विभाग,नागपूर.
१०. सदस्य सचिव,मजीप्रा,मुंबई.
११. महालेखापाल,महाराष्ट्र-१,मुंबई (लेखापरिक्षा व अनुज्ञेयता).
१२. महालेखापाल,महाराष्ट्र-२,नागपूर (लेखापरिक्षा व अनुज्ञेयता).
१३. जिल्हाधिकारी, नागपूर.
१४. संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नागपूर.
१६. मुख्य अभियंता,मजीप्रा,प्रादेशिक विभाग,नागपूर.
१७. संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,सिडको भवन,बेलापूर
१८.संचालक (वित्त) म.जी.प्रा. बेलापूर, नवी मुंबई.
१९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,जिल्हा नागपूर.
२०.अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नागपूर.
२१.कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद, नागपूर.
२२.मु.अ.तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुबई.
२३.कार्यासन पापु-४, ६, ७, ९, १०, १७, १८ व पापु-२० पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
२४.निवडनस्ती पापु-१३, पा.पु.व स्व.वि.मंत्रालय, मुंबई.